स्मरणपत्र-१

**तात्काळ/कालमर्यादित**

क्र/जिपना/पंचा/स्था-६/ ११११ /२०२१
कार्यालय जि.प. नागपूर (पंचायत विभाग)
दिनांक- २३ /०४/२०२१

**प्रती,**

गट विकास अधिकारी
पंचायत समिती (सर्व)

**विषय :-** महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियमामध्ये सुधारणा करणेबाबत.

**संदर्भ :-** १.उपसचिव महा.शासन ग्रामविकास विभाग,यांचे पत्र क्र.व्हीपीएम-२०१६/प्र.क्र.१६६/पंरा-४/मुंबई-०१ दिनांक ३०.११.२०१९

२.या कार्यालयाचे पत्र क्र/जिपना/पंचा/वि.अ.(पंचा.)१००८७/१९ दिनांक ३१.१२.२०१९

३.उपसचिव महा.शासन ग्रामविकास विभाग,यांचे अ.शा.पत्र क्र.व्हीपीएम-२०१६/प्र.क्र.१६६/पंरा-४/मुंबई-०१ दिनांक ९.४.२०२१

उपरोक्त संदर्भीये विषयान्वये महा.शासन ग्रामविकास विभागातर्फ, शासन अधिसुचना क्र.व्हीपीएम२०१६/प्र.क्र.१६६/पंरा ४/मुंबई-०१ दिनांक २८.नोंव्हेबर,२०१९ अन्वये, महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम,१९६० मध्ये सुधारणा करण्याच्या अनुषगांने नियमाचा मसुदा करण्यात आलेला आहे.सदर मसुदा पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर प्रसिध्द करुन यासंदर्भात प्राप्त होणा-या हरकती व सुचना विनाविलंब सादर करण्यास्तव या कार्यालयाचे दिनांक ३१.१२.२०१९ चे पत्रान्वये आपणास कळविण्यात आले आहे.परंतु अधिसुचना प्रसिध्द केल्याची माहिती आपणाकडुन प्राप्त नसल्याने याबाबतचाअहवाल शासनास सादर करता आले नाही.

**तेव्हा सदर मसुदा यासोबत पुनश्च आपणाकडे पाठविण्यात येत आहे.सदर अधिसुचनेचा मसुदा पंचायत समितीचे अधिनस्त असलेल्या ग्रामपंचायत तसेच पंचायत समितीचे सुचना फलकांवर प्रसिध्द करुन आपणाकडे प्राप्त होणा-या हरकती व सुचना विनाविलंब यासोबतच्या तक्त्यामध्ये दिनांक २९.४.२०२१ पर्यत न चुकता पाठविण्यात याव्यात.**

**सहपत्र**-शासन अधिसुचना(नियमाचा मसुदा)

राजेंद्र भुयार
उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पंचा.)
जिल्हा परिषद नागपूर

**प्रत-** १.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांना माहितीस सविनय सादर.

२.उपसचिव महा.शासन ग्रामविकास विभाग,बांधकाम भवन,मर्झबान पथ,फोर्ट,मंत्रालय,मुंबई-०१ यांना माहितीस सविनय सादर.

O/C

उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पंचा.)
जिल्हा परिषद नागपूर